Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VII ISSUE- XI NOVEMBER 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# अभिनेता सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरण : प्रसारमाध्यमांची कार्यक्षमता आणि हेतूबद्दलचे काही प्रश्न

डॉ.रामानंद बापुराव व्यवहारे,
प्राध्यापक,
वृत्रपत्रविद्या आणि जनसंवाद,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

**प्रस्तावना :-**

बॉलीवूड अभिनेता सुशांतसिंह राजपूत (वय ३४ वर्षे) यांनी १३ जून २०२० शनिवारी मध्यरात्री स्वतःच्या घरी मुंबईत गळफास घेऊन आत्महत्या केली. ही बातमी १४ जून रविवारी संपूर्ण देशभरात पसरली. सर्व प्रसारमाध्यमे सुशांतसिंहच्या बातम्या देण्यात गुंतलेले होते. सुशांतसिंहबद्दल पत्रकार वेगवेगळी, उलटसुलट माहिती मिळवून आपापल्या प्रसारमाध्यमाव्दारे जनतेसमोर ठेवताना दिसत होते. संपूर्ण महाराष्ट्रात, महाराष्ट्रातील जनतेमध्ये प्रसारमाध्यमांनी सुशांतसिंहचे आत्महत्या प्रकरण विविध ॲंगल्समधून जनतेसमोर ठेवले. त्यामुळे वृत्तपत्र, दूरचित्रवाणी, सोशल माध्यमांबद्दलचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यापैकी सर्वाधिक महत्वाचे वाटणारे प्रसारमाध्यमांची कार्यक्षमता आणि हेतू या दोन प्रश्नांची चर्चा प्रस्तुत शोधनिबंधातून केलेली आहे.

**उद्देश :-**

१) सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरण : प्रसारमाध्यमांच्या कार्यक्षमतेबद्दल चर्चा करणे.

२) सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरण : प्रसारमाध्यमांचे हेतू स्पष्ट करून सांगणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोधनिबंधाचा विषय सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरण : प्रसारमाध्यमांची कार्यक्षमता आणि हेतूबद्दलचे काही प्रश्न (SUSHANTSINH RAJPUT ATMHATTAYA PRAKARAN : PRASARMADDHYAMNCHE KARRYASHMATA ANI HETUBADDALCHE KAHI PRASHNA) असा आहे. सुशांतसिंहची आत्महत्या दुदैवी आहे. त्याने आत्महत्या करायला नको होती. त्याच्या आत्महत्येमुळे, जाण्याने अनेकांना दुःख झालेले आहे. मलासुध्दा झालेले आहे; परंतु सुशांतसिंहच्या आत्महत्येनंतर सर्व प्रसारमाध्यमांनी ज्या बातम्या, वृत्तलेख, इतर स्वरुपात मजकूर दिला. त्याच्याबद्दल जे आरोप-प्रत्यारोप, राजकारण झाले त्याबद्दलच्या बातम्या, वृत्तलेख दिले. ज्या प्रमाणात, ज्या प्रकारे दिले. ज्या कार्यक्षमतेने दिले, ज्या हेतूने दिले. त्यामुळे प्रसारमाध्यमांबद्दल अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यापैकी काही महत्वाच्या प्रश्नांची चर्चा, मांडणी येथे केली आहे. त्या अनुषंगाने शोधनिबंधाची मांडणी करीत असतांना वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमांव्दारे प्रकाशित, प्रसारित बातम्या, वृत्तलेख, लेख यांचे संदर्भ अभ्यासून तज्ञांनी लिहिलेल्या लेखांचा, ग्रंथांचा आधार घेतला आहे. लेखकांने स्वतःची मते, अनुभव, निरीक्षण, दृष्टिकोन इत्यादींच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**सुशांतसिंह आत्महत्या प्रकरण :-**

"सुशांतसिंह राजपूत मुळचा पाटण्याचा. तो मुंबईत बांद्रे येथील माऊंट ब्लॉक इमारतीत राहात होता. दोन स्वंयपाकी, एक नोकर त्यांच्या घरी होते. तो

एका अभिनेत्रीशी लिव्ह इन रिलेशनशीपमध्ये होता. १३ जून २०२० रोजी शनिवारी रात्री तो आपल्या रुममध्ये झोपला. १४ जून २०२० रविवार रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास त्याने ज्यूस घेऊन बेडरुममध्ये गेला. ११ च्या सुमारास नोकराने त्याच्या बेडरुमचे दार ठोठावले; परंतु त्याने दार न उघडल्यामुळे त्याच्या बहिणीशी संपर्क केली. पोलिसांना माहिती दिल्यानंतर त्यांच्याकरवी दार उघडण्यात आले तेव्हा सुशांतसिंह गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आला. हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले."[१] लोकमत वृत्तपत्रातील बॅनर न्युजमधील सुशांतसिंह राजपुतच्या आत्महत्येबाबतची ही माहिती आहे. १५ जून २०२० रोजी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांनी सुशांतसिंह राजपुतच्या आत्महत्योबद्दल प्राधान्याने वृत्त, वृत्तलेख प्रकाशित केले. वृत्तवाहिन्यांची स्टो-या प्रसारित केल्या. पंतप्रधान, मुख्यमंत्री, बॉलीवूडमधील प्रसिध्द व्यक्तिंच्या प्रतिक्रिया छापल्या, प्रसारित केल्या. सुशांतसिंह ..... द अनटोल्ड स्टोरी या मथळ्याखाली दै. लोकमत या आघाडीच्या वृत्तपत्राने स्वतंत्र पानभर मजकूर प्रकाशित केला. त्यामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेकांचे शोकसंदेश आहेत.

सुशांतसिंह यांनी आत्महत्या केली नसून त्यांच्या खून करण्यात आला असल्याचा आरोप त्याचे वडील कृष्णकुमार सिंह यांनी केला. त्यांनी थेट रिया चक्रवर्ती, अंकिता लोखंडे यांची नावं घेतली. इकडे अभिनेत्री कंगना, रनौतने अनेकांवर वेगवेगळे आरोप केले. या सर्व आरोपांना व तपास यत्रणांना सर्व प्रसारमाध्यमांनी जम्बो कव्हरेज दिले. या प्रकारणाला मोठे राजकीय वळण लागले. त्यामध्ये प्रसारमाध्यमे, पत्रकारही उतरले. "वाचकांना द्यावयाच्या बातमीला आकार व रुप देण्याचे काम वार्ताहराचे—पत्रकाराचेच आहे. त्याच्या सोअर्स किंवा उगमाचे नव्हे ! (रिपोर्टिंग ॲन्ड रायटींग द न्यूज पृ. ३००) सोअर्सच जर बातमीचे स्वरुप ठरवू लागला तर वार्ताहर हे वाहक किंवा एजंटच ठरणार ! पत्रकार म्हणजे सोअर्सकडून बातम्यांच्या जशाच्या तशा ठेवी घेणारे एल.आय.सी. किंवा पिग्मी एजंट नव्हेत हे आम्हा पत्रकारांनी ध्यानात घ्यायला हवे. आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा व आत्मसन्मान आपल्या कृतीतून व वर्तनातून दिसतो. पत्रकारितेचे मुख्य वर्तन बातम्यातून दिसते व म्हणूनच बातम्या देताना वार्ताहरांनी सोअर्सकडून आलेल्या माहितीची व तथ्यांची शहानिशा करायला हवी, तपासणी व चाळणी करायला हवी, त्यातील विर्पयस्त वाटणा-या माहितीस फाटा दिला पाहिजे, आव्हान दिले पाहिजे व वाचकांना आवश्यक ती पार्श्वभूमी न्यूजस्टोरीत दिली पाहिजे."[२] सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणात पत्रकारांनी माहिती आणि तथ्यांची कोणतीही शहानिशा, तपासणी चाळणी केल्याचे आढळत नाही. विर्पयस्त माहितीला फाटा आणि आव्हान दिला नाही.

**प्रसारमाध्यमांची स्पर्धा :-**

१५ जून २०२० पासून ते ३० सप्टेंबर २०२० पर्यंत सुमारे साडेतीन महिने प्रसारमाध्यमे सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणी वेगवेगळी माहिती, बातम्या, वृत्तलेख देत होते. सुशांतसिंहचे संपूर्ण खाजगी आयुष्य त्यांनी लोकांसमोर ठेवण्याचे महान कार्य केले. अंकिता लोखंडे, रिया चक्रवर्ती यांच्याबद्दल लिव्ह इन रिलेशनबद्दल बरीच चर्चा, माहिती लोकांसमोर आली ती प्रसारमाध्यमांमार्फतच. अभिनेत्री कंगना रनौतने केलेल स्फोटक वक्तव्ये, आरोप-प्रत्यारोप प्रसारमाध्यमांनी लोकांसमोर ठेवले. शिवसेना नेते संजय राऊत, मंत्री आदित्य ठाकरे यांची नावे पुढे आली. कंगनाच्या बेकायदा बांधकामावर हातोडा पडला. त्याबद्दलचा निकाल नुकताच न्यायालयाने दिला. या सर्व घटना-घडामोडी-हालचाली लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रसारमाध्यमांची स्पर्धा लागली होती. सोशल माध्यमाने तर सुशांतसिंहच्या आत्म्याला बोलके करण्याची कमाल केली. आत्महत्येचा तपास, त्यातून पुढे

आलेले ड्रग्ज कनेक्शन्स् असे अनेक पैलू सुशांतसिंह राजपूत आत्महत्येने प्रसारमाध्यमांव्दारे लोकांसमोर ठेवलेले आहेत. यासंबंधीच्या बातम्या, माहिती देण्यासाठी प्रसारमाध्यमांची मोठी स्पर्धा पहायला मिळाली. टी.आर.पी.मुळे त्यामध्ये अनेकांना इच्छा नसतांनाही उड्या घ्याव्या लागला. यावरुन स्पष्टपणे दिसून येते की, प्रसारमाध्यमांमध्ये सुशांतसिंह राजपूत आत्महत्या प्रकरणी माहिती देण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्पर्धा होती.

**एवढी कार्यक्षमता कशासाठी ? :-**

"वृत्तपत्रांना लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हटले जाते. त्यात वृत्तपत्रांच्या लोकशाहीतील मोलाच्या व महत्वपूर्ण कार्याचा व योगदानाचा जसा गौरव आहे, त्याप्रमाणे तेवढीच मोठी जबाबदारीही त्यांच्यावर येते, हाही भाग त्या अंतर्भूत आहे. संसद न्यायदानयंत्रणा आणि प्रशासन किंवा नोकरशाही यांच्यासारख्या तो लोकशाहीतील महत्वपूर्ण जबाबदारी पेलणारा स्तंभ होय. वृत्तपत्र काढता येणे, माहिती मिळविणे, माहिती सादर करणे, मुक्तपणे विचार व मते मांडणे, यांचा समावेश स्वातंत्र्यात होतो. त्याचवेळी समाजहिताची सतत जाण असणे आणि त्यानुसार योग्य ते छापणे, याचीही सतत चाड बाळगावी लागते."[३] सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणात वृत्तपत्रांसह सर्वच प्रसारमाध्यमांनी एवढी मोठी कार्यक्षमता कशासाठी दाखवली ? यातून काय आणि कोणते समाजहित साध्य झाले ? माहितीची पडताळणी न करता ती उलट-सुलटपणे का देण्यात आली ? त्यामागे कोणते हेतू होते ? पत्रकार आणि प्रसारमाध्यमांनी माहितीची सत्यता का पडताळली नाही? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.

मागील पाच-सात वर्षांपासून महाराष्ट्रात सर्वत्र विविध कारणांमुळे शेकडो शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्या अजुनही सुरुच आहेत. याबद्दल प्रसारमाध्यमे काहीही का बोलत नाहीत ? शेतक-यांच्या आत्महत्येची चर्चा झाली पाहिजे. कारणांचा शोध घेतला पाहिजे. उपाययोजना झाल्या पाहिजेत. आत्महत्या थांबविल्या पाहिजेत. यासाठी प्रसारमाध्यमे समाजहिताच्या माहितीला प्राधान्य देत नसल्याचे स्पष्टपणे जाणवते. देशात, महाराष्ट्रात, विविध विभागात, जिल्ह्यात आणि शहर, गांव खेड्या-पाड्यात आज अनेक प्रश्न, समस्या आहेत. त्याबद्दल प्रसारमाध्यमांनी चर्चा केली पाहिजे. प्रश्न, समस्या, सोडविल्या पाहिजे. सोडविण्यासाठी संबंधितांवर दबाव टाकला पाहिजे. हेच खरे माध्यम स्वातंत्र्य आणि जबाबदारी आहे. सुशांतसिंह आत्महत्या, ड्रग्ज कनेक्शन्सचा महाराष्ट्रातील कोट्यावधी जनतेशी काय संबध आहे ?

"माहिती आणि संज्ञापन—तंत्रज्ञानात एकत्रिकरण आणि जागतिकीकरण (Convergence, Globalization) घडून येत आहे. प्रत्येक देशाने आपापल्या गरजेप्रमाणे आधुनिक संज्ञापनमाध्यमांचा वापर राष्ट्रीय विकासासाठी कसा करायचा, त्यासाठी माध्यमांवर कसा, किती अधिकार ठेवायचा इ. मुद्यांविषयीचा अभ्यास आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या वेगाने करायला हवा आहे. हे काम आवश्यक पण तितकेच आवघड आहे. कारण विकासाच्या संकल्पानाही काळानुरुप बदलत आहेत."[४] एवढी मोठी आव्हाने आपल्यासमोर असताना सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणी प्रसारमाध्यमांनी खूप मोठ्या कालावधीसाठी एवढा वेळ आणि जागा देणे परवाडणारे नाही. कोणाच्या तरी आरोपावरून मोठी तपासयंत्रणा त्यामध्ये गुंतवून जनतेचा सार्वजनिक पैसा वाया घालविणे, प्रसारमाध्यमांचा वापर अयोग्यरित्या करणे पूर्णपणे चुकीचे ठरते.

**हेतू कोणते ? :-**

"जब तक प्रिंट की पत्रकारिता थी, तो पत्रकारिता काफी हद तक मिशन की पत्रकारिता थी | यानी इससे जुडने वाले किसी बहुत बडे लाभ की उम्मीद

से इससे नहीं जुडते थे | यह एक तरह से एक चमक-दमक वाला कैरिअर नहीं था उनके लिए | लेकिन टेलिवीजन पत्रकारिता के आते ही वह मिशन प्रोफेशन मे बदल गया | नई पीढी ने पत्रकारिता को भी एक प्रोफेशन की तरह देखना शुरु किया | आज की पीढी के लिए कह सकते हैं कि यह सबसे बडा प्रोफेशन बनकर उभरा है |"[५] सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणात सनसनाटी, अवैवाहिक संबंध, बड्या व्यक्तिंची नावं, प्रत्यारोप-आरोप, ग्लॅमरस असे अनेक बातमीमूल्ये आणि घटक होते, आहेत. ते जाणीवपूर्वक काही प्रमाणात निर्माण केले गेल्याचे दिसते. मुद्रित इलेक्ट्रॉनिक तसेच समाज माध्यमांनी याला खूप महत्व दिले. पत्रकारितेच्या मर्यादा, नितिमूल्ये पायदळी तुडवले गेले. माध्यमांनी गैरप्रकारने पत्रकारिता करून आपला खप (विक्री) आणि टी.आर.पी. वाढविला असे स्पष्टपणे दिसून येत आहे. आरोप-प्रत्यारोप होत असताना त्यामधील सत्यता (खरेपणा) प्रसारमाध्यमांच्या पत्रकारांनी तपासायला हवी होती. संपादकांनी तरी यासाठी आग्रह धरायला हवा होता; परंतु तसे काही झाल्याचे दिसून आल्याचे आढळत नाही. यावरून पत्रकारितेचा हेतू आणि प्रसारमाध्यमांचे मिशन लक्षात येते.

"महाराष्ट्रातील कॉंग्रेस (इं.) अंतर्गत माजी मुख्यमंत्री श्री सुधाकरराव नाईक विरुध्द मुख्यमंत्री श्री शरद पवार यांचे कट्टर अनुयायी डॉ. पद्मसिंह पाटील यांच्या मधील गटबाजीच्या सत्तासंघर्षात इंग्रजी, मराठी व हिंदी पत्रसृष्टीही सक्रीय सामील झाली होती. पत्रकार व वृत्तपत्रांची ही सक्रीयता इतक्या टोकाला गेली होती की वाचकांना वाटावे की हे कॉग्रेसच्या गटबाजीतून सक्रीय म्होरकेच! अनेक इंग्रजी, मराठी व हिंदी वृत्तपत्रात राजकीय वार्तांचे विभाग सांभाळणारे अनुभवी व तज्ज्ञ राजकीय वार्ताहर आहेत. या वार्ताहरांनी सत्तेच्या संघर्षातील दोन गटांमधील सुंदोपसुंदी आपल्या कडेवर घेऊन वाचकांना राजकीय सत्य सांगण्याचा प्रयत्न करण्याऐवजी कोणत्यातरी एका गटाची तळी उचलली. ही तळी पण एवढी उचलली की वाचकांना प्रश्न पडावा की हे पत्रकार की भाट? एखाद्या पक्षाअंतर्गत दोन गटांमध्ये किंवा व्यक्तिमध्ये सत्तासंघर्ष चालला असेल तर वाचकांना तटस्थपणे या सर्व प्रकाराचे राजकीय विश्लेषण करून सत्य सांगण्याचा यथाशक्ती व यथमती प्रयत्न करण्याऐवजी वेगवेगळ्या गटाचे प्रचारमंत्री (प्रपोगंडा मिनिस्टर) झालेल्या तज्ज्ञ राजकीय वार्ताहरांनी व संपादकांनी आपल्या सोयीची राजकीय बाजू एखाद्या अनुभवी राजकीय कार्यकर्त्याने अभिनिवेषाने मांडावी त्या स्पीरीट ने मांडली ! भांडणारे राजकीय नेते मग ते कुणीही असोत, आपला गट बळकट व्हावा व आपली प्रतिमा चांगली रहावी यासाठी वृत्तपत्रांना व पत्रकारांना हाताशी धरण्याचा प्रयत्न करणारच ! परंतु पत्रकारितेचा दुरुपयोग आपल्या व्यक्तिगत, राजकीय गटबाजीसाठी करण्याच्या मोहिमेत पत्रकारांनी सामील का व्हावे ? एखाद्या नेत्याची भाटगिरी का करायची ? राजकीय नेत्यांबरोबर राजकीय पत्रकारांनी वहात जायचे काय ? राजकीय नेते आपला उपयोग राजकारणाचे एक साधन म्हणून करताहेत हे पत्रकारांनी विसरुन कसे चालेल ? पत्रकार राजकारण्यांचे प्यादे वा बाहुले आहेत काय ? Are journalists puppets of politicians पत्रकार राजकारण्यांच्या कळसूत्र्या बाहुल्या आहेत काय ? हा फिलीप ऑल्ट या बातमीतज्ज्ञाने विचारलेला प्रश्न आजच्या संदर्भात महत्वाचा ठरतो."[६]

सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणामुळे पत्रकारांसह प्रसारमाध्यमे राजकारण्यांच्या कळसुत्र्या बाहुल्या आहेत काय ? हा प्रश्न निर्माण झाला आहे.

**समारोप :-**

सुशांतसिंह आत्महत्या प्रकरणात राजकारण घुसले. महाराष्ट्रातील सत्ताधारी महाविकास आघाडीतील काही बडे नेते, मंत्री यामध्ये सहभागी असल्याचे आरोप झाले. तपासयंत्रणा बदलली गेली. केंद्रातील भाजप सरकारने या प्रकरणात लक्ष घातले.

तपास यंत्रणेला काहीही हाती लागले नाही. सुशांतसिंहने आत्महत्या केली असा पोस्टमार्टम रिपोर्ट सांगतो. बड्या तारकांच्या, बायकांच्या चौकशा झाल्या. सुमारे साडेतीन महिने प्रसारमाध्यमांनी याबद्दलच्या बातम्या, वृत्तलेख आणि इतर स्वरुपातील मजकुर देऊन वाचक, दर्शकांना गुतवून ठेवले. खरे विकासाचे प्रश्न अनुत्तरीतच राहिले. प्रसारमाध्यमे आणि पत्रकार अशा पध्दतीने आपली कार्यक्षमता वापरून आपले मिशन ठरवत असतील, तर येणा-या काळात भारतातील लोकशाहीला फार मोठा धोका निर्माण होऊ शकतो हे आपण वेळीच ओळखून उपाययोजना करण्याची अत्यंत आवश्यकता वाटते.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

१. दै. लोकमत, संपादक - सुधीर महाजन, दि. १५ जून २०२० च्या अंकातील पृष्ठ-१ वरील सुशांत-- —--- वृत्तलेख.
२. पत्रकारिता विचार व व्यवहार, प्रा. सुधीर वामनराव गव्हाणे, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती-फेब्रुवारी १९९५, पृष्ठ-८०.
३. पत्रकारिता मार्गदर्शक, एस.के. कुलकर्णी, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे-३०, तिसरी आवृत्ती -२००९, पृष्ठ -२८६.
४. संवादविश्व, सुषमा दातार, संवादविश्व प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००१, पृष्ठ-१२८.
५. ब्रेकिंग न्यूज, पुष्प प्रसून वाजपेय, जुगनू प्रकाशन नई दिल्ली प्रथम संस्करण : २००६ पृष्ठ - ४४.
६. पत्रकारिता विचार व व्यवहार, प्रा. सुधीर वामनराव गव्हाणे, प्रचार प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती-फेब्रुवारी १९९५, पृष्ठ-७८.